नक्षलग्रस्त भागामध्ये नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या वेतन श्रेणी आणि वेतन निश्चितीबाबत.........

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**अर्थ प्रशासन विभाग**
**पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)**

महत्वाचे / तात्काळ
जा.क्र.अप्रवि/वे.नि./ ४४४ /२०१९ दिनांक:२८ /०२/२०१९

वाचा : १) शासन पत्र क्रमांकः पंदेवि १३१८/प्र.क्र.१७९/६-अे, दि.२८ फेब्रुवारी,२०१९.

## परिपत्रक

कृषि विद्यापीठातील नक्षलग्रस्त भागामध्ये नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या वेतन श्रेणी आणि वेतन निश्चितीबाबत संदर्भात दि.२८/०२/२०१९ रोजी उचित कार्यवाहीस्तव शासनाकडून पत्र प्राप्त झाले आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील सबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी उपरोक्त सबंधी तात्काळ कार्यवाही करावी.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

सोबत : शासन पत्र दि.२८/०२/२०१९.

प्रत :१) सर्व विभागप्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी, डॉ.पं दे.कृ.वि., अकोला / नागपूर.
२) मा.कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु महोदय यांचे माहितीस्तव.
३) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.
४) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक

circular

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : पंदेवि १३१८/प्र.क्र.१७९/६-अे
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई :३२
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,

विषय : नक्षलग्रस्त भागामध्ये नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणी आणि वेतन निश्चितीबाबत..

संदर्भ : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.टीआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा, दि.६ ऑगस्ट, २००२.
२) नियंत्रक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे पत्र क्र.अप्रवि/अंलेप/६००/२०१८, दि.२५.७.२०१८/ दि.३०.८.२०१८, क्र.अंलेप/१८३४/२०१७, दि.१८.११.२०१७, क्र.अप्रवि/अंलेप.कक्ष/४०/ २०१८, दि.१६.४.२०१८.

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भाधीन क्र.(२) येथील पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भाधीन क्र.(१) येथील सामान्य प्रशासन विभागाचे दि.६ ऑगस्ट, २००२ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.३(७) मधील तरतुदीनुसार विद्यापीठातील कर्मचा-यांची नक्षलग्रस्त भागामध्ये नेमणूक झाल्यानंतर, अशा नेमणूकीच्या कालावधीत त्यांना नजिकची वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते. उदा. (१) रु. ९३००-३४६०० + ग्रेड पे. रु.४४०० या वेतनश्रेणीतील वरिष्ठ संशोधन सहायकाचे नक्षलग्रस्त भागामध्ये नेमणूक झाल्यानंतर प्रथम रु.४६०० हे ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरते आणि त्यानंतर रु.१५६००-३९१००+ग्रेड पे.रु.६००० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते. तसेच, (२) रु.१५६००-३९१०० + ग्रेड पे.रु.६००० या वेतनश्रेणीतील सहायक प्राध्यापकास प्रथम याच वेतनश्रेणीतील ग्रेड पे रु.७००० हे नजिकचे वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते आणि त्यानंतर याच वेतनश्रेणीतील रु.८००० ग्रेड पे. अनुज्ञेय ठरते.

२. कोणत्याही परिस्थितीत रु.९३००-३४६०० + ग्रेड पे.रु.४४०० या वेतनश्रेणीमधील वरिष्ठ संशोधन सहायकास सहायक प्राध्यापकाची रु.१५६००-३९१०० + ग्रेड पे. रु.६००० ही वेतनश्रेणी प्रथम अनुज्ञेय ठरत नाही. तसेच, रु.१५६००- ३९१०० + ग्रेड पे. रु.६००० या वेतनश्रेणी मधील सहायक प्राध्यापकास सहयोगी प्राध्यापकाची रु.३७४००-६७०००+ग्रेड पे. रु. ९००० ही वेतनश्रेणी प्रथम अनुज्ञेय ठरत नाही.

३. सबब, नियंत्रक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी संदर्भाधीन पत्रान्वये नक्षलग्रस्त भागामध्ये नेमणूक झालेल्या कर्मचा-यास नजिकची वरिष्ठ वेतनश्रेणी प्रथम अनुज्ञेय ठरत असल्याची व्यक्त केलेली धारणा या विभागाकडून पक्की करण्यात येत आहे.

४. आपणांस असेही कळविण्यात येते की, पीबी-४, रु.३७४००-६७००० या वेतनश्रेणीमध्ये रु.८००० ही ग्रेड.पे. विहित नाही.

५. तसेच, विद्यापीठातील कर्मचा-यांची नक्षलग्रस्त भागामध्ये नेमणूक झाल्यानंतर चुकीची वेतनश्रेणी दिली असल्यास वरील स्पष्टीकरणाच्या पार्श्वभूमिवर सुधारित आदेश काढून संबंधितांकडून जादा प्रदान करण्यात आलेली रक्कम वसूल करण्यात यावी.

६. तरी, प्रस्तूत प्रकरणी नियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

(दे.आ.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महासंचालक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२-ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे : ४११ १०७ यांचेकडे उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
२. कुलगुरु/कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
३. कक्ष अधिकारी ( कार्यासन-१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२. (अनौ. संदर्भ क्र.६९/२०१९, दि.७.२.२०१९)
४. निवडनस्ती (कार्यासन-६ओ)